# MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES EXAMINATION BOARD
# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

MCAER Building, 132/B, Bhosalenagar, Pune – 411007

020-25528519/119 https://www.mcaer.org/maueb.html E-mail: mauebpune@yahoo.co.in


जा.क्र. मकृविपमं/पसाप्रप-२०२५/बातमी/**४९८**/२०२५ दिनांक : १३/०२/२०२५

बातमी क्र. ०१

## बातमी प्रसिध्दीसाठी

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्याशाखांमध्ये शैक्षणिक वर्ष, २०२५-२०२६ साठी **“पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२५” (PG-CET-2025)** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत संभाव्यतः दि. २३.०५.२०२५ ते दि. २५.०५.२०२५ या कालावधीत महाराष्ट्रातील १७ केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखेचे पदवीधर आणि सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम वर्षातील पदवी परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **https://www.mcaer.org** या संकेतस्थळावर, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२५ करिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या स्वतंत्र लिंकद्वारे स्वत: भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचणे गरजेचे आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा-२०२५ संदर्भातील महत्वाच्या तारीख व अन्य तपशील खालीलप्रमाणे:

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** | **ऑनलाईन (नेटबँकिंग) अर्ज भरण्याचा कालावधी** | : | **दि. १५.०२.२०२५ (दुपारी १२.०१) ते दि. १०.०३.२०२५ (रात्रौ ११.५९ )** |
| **ब)** | **ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन बॅकींग (नेटबॅकींग) डेबिट/ क्रेडीट कार्डव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी** | : | **दि. १५.०२.२०२५ (दुपारी १२.०१) ते दि. १२.०३.२०२५ (दुपारी १२.०१)** |
| **क)** | **अंतिम पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रदर्शित करणे** | : | **दि. १८.०३.२०२५ ते दि. २०.०३.२०२५** |
| **ड)** | **उत्तर तालिका प्रदर्शित करणे** | : | **दि. ०५.०६.२०२५** |
| **इ)** | **परीक्षेचा निकाल प्रदर्शित करणे (संभाव्य दि.)** | : | **दि. १०.०६.२०२५** |

**टीप:**

- ह्या परीक्षेसंबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.
- पात्र उमेदवारांनी आपले परीक्षा प्रवेशपत्र वरील संकेतस्थळावरुन दि. १४.०५.२०२५ पासून स्वत: प्रिंट (Print) काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

या संदर्भांत अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८११९/ ०२०-२५५२८५१९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे डॉ. अमोल मा. देठे, नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांनी कळविले आहे.

दिनांक : १३.०२.२०२५
स्थळ : पुणे

*स्वाक्षरीत/-*
**नियंत्रक**
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे
(मो.नं. 7588611025)